क्र.सीएमएम/ओसी/ ४५/२०२३
मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे
कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई.
दिनांक : १२.१२.२०२३

# प रि प त्र क

**संदर्भ: मा. केंद्रिय प्रकल्प समन्वयक, ई—कोर्ट प्रोजेक्ट, उच्च न्यायालय, मुंबई यांचा दिनांक ११.१२.२०२३ रोजीचा ई—मेल.**

उपरोक्त संदर्भास अनुसरुन, मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई या कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व न्यायालयीन केंद्रामधील सर्व न्यायीक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, माननीय ई—समिती, भारतीय सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या माहितीनुसार मा. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयासाठी तयार करण्यात आलेले नविन संकेतस्थळ (Website) **https://cmmmumbai.dcourts.gov.in** **दिनांक १३.१२.२०२३ रोजी दुपारी ३.००** वाजल्यापासून उपलब्ध होईल. या कार्यालयाच्या आस्थापनेमधून वेळोवेळी निर्गमीत होणारे कार्यालयीन आदेश/परिपत्रक/अधिसूचना वरील संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील. त्यामुळे या संकेतस्थळाचा न्यायालयीन कामकाजाकरीता वापर करावा.

सर्व न्यायिक अधिकारी/कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, https://cmmmumbai.dcourts.gov.in हे नविन संकेतस्थळ (Website) आपल्या न्यायालयीन केंद्रातील सूचना फलकावर वकील, पक्षकार, संबंधित पोलीस ठाणे आणि इतर सर्वांच्या निदर्शनास येईल अशा ठिकाणी प्रसिध्द करावे.

12/12/23
**(एम. आर. ए. शेख)**
मुख्य महानगर दंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

**प्रत माहितीस्तव रवाना:**
**मा. केंद्रिय प्रकल्प समन्वयक, ई—कोर्ट प्रोजेक्ट, उच्च न्यायालय, मुंबई**

...२

<u>प्रत रवाना</u>...

१. सर्व अति. मुख्य महानगर दंडाधिकारी व महानगर दंडाधिकारी, मुंबई.
२. प्रबंधक, एस्प्लनेड, मुंबई.
३. सर्व न्यायालयीन वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष/सचिव.
४. महापालिका आयुक्त, मुंबई.
५. पोलिस आयुक्त, मुंबई.
६. मुख्य पोलिस अभियोक्ता, मुंबई.
७. उप प्रबंधक/सर्व सहायक प्रबंधक/नियंत्रक न्यायलिपिक.
८. पोलीस निरीक्षक (W. Rly), मुंबई सेंट्रल.
९. पोलीस निरीक्षक (C. Rly), सी.एस.टी
१०.तुरुंग अधिकारी— मुंबई मध्यवर्ती कारागृह, भायखाळा जिल्हा कारागृह, ठाणे जिल्हा कारागृह, तळोजा मध्यवर्ती कारागृह, येरवडा मध्यवर्ती कारागृह, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर मध्यवर्ती कारागृह.
११.महाराष्ट्र तुरुंग विभाग मुख्यालय, पुणे व त्यांच्या अखत्यारीतील सर्व तुरुंग अधिकारी यांच्यासाठी.
१२.सर्व विभाग.
१३.परिपत्रक नस्ती.